# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## अधिसूचना

क्र. परीक्षा/उन्हाळी–2018/1377 दिनांक: 29-09-2017

### उन्हाळी २०१८ परीक्षेकरीता आवेदन पत्रे महाविद्यालयातून भरण्याची पध्दत

सर्व संबंधिताच्या माहितीकरीता सुचित करण्यात येते की उन्हाळी–2018 मध्ये होणाऱ्या विद्यापीठाच्या वार्षिक आणि तृतीय वर्षातील प्रवेशित नियमित विद्यार्थ्यांचे परिक्षांपुर्व कामे तसेच सेमिस्टर पॅटर्न च्या सर्व विद्यार्थ्यांची जुने अनुउत्तीर्ण माजी विद्यार्थी, बहि:शाल विद्यार्थ्यांनी परिक्षा आवेदन पत्रे ऑनलाईन पध्दतीने महाविद्यालयाचे स्तरावर सादर करावीत.

वरील सर्व अभ्यासक्रमाच्या परिक्षांची परीक्षा आवेदन पत्रे ऑनलाईन पध्दतीनुसार खालील नमुद केल्याप्रमाणे सादर करावीत.

1. नियमित महाविद्यालयीन / माजी विद्यार्थी (म्हणजे जुने अनुत्तीर्ण विद्यार्थी व हिवाळी – 2017 परीक्षेचे अनुत्तीर्ण विद्यार्थी) पूर्वी ज्या महाविद्यालयाचे नियमित विद्यार्थी होते, त्याच महाविद्यालया मधून परीक्षा ऑनलाईन आवेदन पत्रे सादर करतील.

सन 2017 - 18 च्या रब्बी हंगामातील पैसेवारी 50 पैशांपेक्षा कमी असलेल्या टंचाईग्रस्त गावातील यादी www.nagpuruniversity.org या संकेत स्थळावर प्रकाशित करण्यांत आल्यानुसार त्या विद्यार्थ्याकडून सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र घेऊन त्यांना त्याप्रमाणे शुल्क आकारू नये.

2. बी.ए. बहि:शाल व माजी विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्रे ज्या महाविद्यालयात संबंधीत अभ्यासक्रम शिकविल्या जातो अशा विविध महाविद्यालयांमध्ये स्विकारण्यात येते. परंतू निर्देश क्र. 2/2010 नुसार पर्यावरण अभ्यासक्रम अनिवार्य असल्यामुळे सदर परीक्षेचे आवेदन पत्रे ज्या महाविद्यालयात हा अभ्यासक्रम शिकविला जातो तेथुन सादर करावे व त्याच महाविद्यालयात पर्यावरण अभ्यासक्रमाकरिता Casual प्रवेश घेऊन हा अभ्यासक्रम पूर्ण करावा. तसेच या विषयाची ग्रेड पाठविण्याबाबत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांना कळवावे.

3. बी.ए., एम.ए व बी.ए. (अतिरिक्त) बहि:शाल अभ्यासक्रमातील ज्या विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिक परीक्षेचे विषय घ्यावयाचे असल्यास अशा विद्यार्थ्यांनी ज्या संबंधीत महाविद्यालयात ते विषय शिकविण्यात येतात तेथेच Casual प्रवेश घेऊन त्याच महाविद्यालयातील बहि:शाल विद्यार्थी म्हणुन त्याच महाविद्यालयातून परीक्षा आवेदन पत्र सादर करावे.

4. एम.ए. सेमिस्टर पॅटर्न या परीक्षेचे ऑनलाईन परीक्षा आवेदन पत्रे ज्या महाविद्यालयात सदर अभ्यासक्रम शिकविला जातो अशा महाविद्यालयाकडून तसेच विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातून स्विकारण्यात येतील. तसेच परीक्षा भवन येथे खालीलप्रमाणे स्वीकारतील.

| अ.क्र. | आवेदन स्विकारण्याचे स्थळ | परीक्षेचे नांव |
|---|---|---|
| 1. | **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,<br>परिक्षा भवन,<br>लक्ष्मीनारायम तांत्रिक संस्था परिसर,<br>भरत नगर, अमरावती रोड, नागपूर–४४००३३.** | बी.ए. (अतिरिक्त) व बी.ए. माजी/बहिशाल व सेमिस्टर पॅटर्नच्या बी.ए – 1, 2, 3 सेमिस्टर<br>एम.ए. प्रथम, द्वितीय, तृतीय व अंतीम सेमिस्टर<br>परिक्षेला बसणारे बहिशाल विद्यार्थी (प्रात्यक्षिक परिक्षा विषय सोडून) |

1. महाविद्यालयीन नियमित वार्षीक परीक्षेशी संबंधीत विद्यार्थ्याचे महाविद्यालयांनी/विद्यापीठ शैक्षणिक विभागांनी विद्यापीठ कार्यालयात उन्हाळी – 2018 परीक्षेची

**आवेदनपत्रे सादर करण्याची अंतिम तारीख :**

**वार्षिक परिक्षा**

बिना विलंब शुल्क : दिनांक 1 डिसेंबर, 2017
विलंब शुल्क रु. 50/- सह :
दिनांक : 15 डिसेंबर, 2017

**सेमिस्टर पॅटर्न**

बिना विलंब शुल्क : 15 जानेवारी 2018 ते
विलंब शुल्क रु. 50/- सह :
31 जानेवारी 2018 पर्यंत

**आवेदन पत्रे स्विकारण्याच्या अंतिम तिथी खालीलप्रमाणे राहतील :–**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th colspan="2">विद्यार्थ्यांची वर्गवारी</th><th colspan="4">अंतिम तारीख</th></tr>
<tr><td>2.</td><td colspan="2">वार्षीक परीक्षेशी व सेमिस्टर पॅटर्न संबंधीत सर्व बहि:शाल (External) व जूने माजी विद्यार्थी (Ex-students i.e. old Failures)</td><td>15 आक्टो 2017 (बिना विलंब शुल्क)</td><td>15 नोव्हे. 2017 (रू 50/- विलंब शुल्कासह)</td><td>30 नोव्हे. 2017 (रू 100/- विलंब शुल्कासह)</td><td>31 डिसें. 2017 (रू 100+रू 10/- प्रति दिवसाला विलंब शुल्कासह)</td></tr>
<tr><td>3.</td><td>हिवाळी २०१७ परीक्षेचे अनुत्तीर्ण विद्यार्थी (Failures of Last Preceding winter 2017 Examination)</td><td>निकाल घोषित झालेल्या तारखे पासून 15 दिवसांचे आंत (बिना विलंब शुल्क)</td><td>बिना विलंब शुल्क अंतिम तारीख संपल्या नंतर पुढील 15 दिवसांचे आंत (रू 50/- विलंब शुल्कासह)</td><td>विलंब शुल्क रू 50/- ची अंतिम तारीख संपल्या नंतर पुढील 15 दिवसांचे आंत किंवा संबंधित परीक्षा सुरू होण्यापूर्वी 15 दिवस अगोदर, यापैकी जो दिवस लवकर येईल, त्या दिवसापर्यंत (रू 1500/- + 50/- प्रति दिवस विलंब शुल्का सह)</td><td>विलंब शुल्क रू 1500/- ची अंतिम तारीख संपल्या नंतर पुढील 15 दिवसांचे आंत किंवा संबंधित परीक्षा सुरू होण्यापूर्वी 15 दिवसांचे अगोदर, यापैकी जो दिवस लवकर येईल, त्या दिवसापर्यंत (रू. 5000/- + 50/- प्रति दिवस विलंब शुल्का सह)</td><td>विलंब शुल्क रू 5000/- + 50/- ची अंतिम तारीख संपल्या नंतर पुढील 15 दिवसांचे आंत किंवा संबंधीत परीक्षा सुरू होण्यापूर्वी 15 दिवसांचे अगोदर यापैकी जो दिवस लवकर येईल त्या दिवसापर्यंत (रू 7000/- + रू. 50/- प्रति दिवस विलंब शुल्का सह)</td></tr>
</table>

4. बहिशाल विद्यार्थी हिवाळी 2017 च्या सेमिस्टर पॅटर्न मधिल वाङ:मय पारंगत परिक्षेतील प्रथम, द्वितीय व तृतीय सेमिस्टरचे उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी निकाल घोषीत झाल्यावर 30 दिवसांचे आत परीक्षा आवेदनपत्रे ज्या महाविद्यालयात जो विषय शिकविण्यात येतो त्याच विषयाचे आवेदनपत्रे ऑनलाईन स्विकारण्यात येतील.

उन्हाळी 2018 मध्ये होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांची ऑनलाईन आवेदन पत्र सादर करणाऱ्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनींनी परीक्षा आवेदन पत्रात वडीलांच्या नावानंतर आईचे नाव लिहणे अनिवार्य राहील याची कृपया नोंद घ्यावी. तसेच परिक्षाशुल्क विद्यापिठाचे परिपत्रक क्रमांक RTMNU/FAO/R/11/220 dated 13-5-2011 नुसार परिक्षा आवेदनपत्र सादर करावे. तसेच अणुतीर्ण विद्यार्थीबाबत अनिसुचना क्रमांक लेखा/व्यय/1014 दिनांक 16/2/2016 नुसार विषय निहाय शुल्क आकारुन आवेदन पत्रे स्वीकारावे. अंतिम तारीख संपल्यानंतर आवेदन पत्रे स्विकारल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थी व महाविद्यालयाची/ विद्यापीठ शैक्षणिक विभागाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी. सर्व महाविद्यालयांना/ विद्यापीठ शैक्षणिक विभागांना विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन परीक्षा आवेदन पत्रे भरून घेण्याविषयी ज्या आवश्यक सूचना पाठविण्यात आलेल्या आहेत, त्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे व विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करूनच विद्यापीठाच्या नियमानुसारच ऑनलाईन आवेदन पत्रे स्विकारावीत.

5. संबंधीत विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा फार्म विद्यापीठाच्या संकेतस्थळ (PORTAL) http//college.rtmnuresults.org वर भरुन त्याची छापील प्रत आवश्यक ती प्रमाणपत्रे व परीक्षा शुल्का सह वर अ.क्र. 1 ते 4 मध्ये दर्शविलेल्या सुचने नुसार अंतिम तारखेच्या आत महाविद्यालयात सादर करावे.

महाविद्यालयांनी हे सर्व परीक्षा अर्ज विद्यापीठास अंतिम तारखे नंतरच्या धनाकर्षासह पाच दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

सर्व महाविद्यालयांना/विद्यापीठ शैक्षणिक विभागांना विद्यार्थ्यांकडून परीक्षा आवेदन पत्रे भरून घेण्याविषयी ज्या आवश्यक सूचना पाठविण्यात आलेल्या आहेत, त्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे व विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करूनच आवेदन पत्रे स्विकारावीत.

टिप : सदर अधिसुचना, परिक्षा आवेदन पत्रे स्विकारण्याचा अंतिम तारखेचा तक्ता अतिमहत्वाच्या सुचना हे विद्यापीठाच्या www.nagpuruniversity.org ह्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**संचालक**, परिक्षा व मूल्यमापन मंडळ